सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर अखिल भारतीय सेवेतील/राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः एमआयएस-१०१७/प्र.क्र.४४८/२०१७/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **२०.०९.२०१७**

शासन परिपत्रक

राज्य शासनाकडून विविध प्रशासकीय विभागांतर्गतच्या न्यायाधिकरण / प्राधिकरण / नियामक आयोग इत्यादीवर अखिल भारतीय सेवेतील / राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्ती / स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर अध्यक्ष / आयुक्त / सदस्य इ. म्हणून नियुक्त्या करण्यात येतात. तथापि सदर नियुक्त्या संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत परस्पर शासन मान्यतेने करण्यात येत असल्यामुळे एका अधिकाऱ्याची एकाच वेळी एकापेक्षा अधिक पदांसाठी निवड केल्याची परिस्थिती उद्भवल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

यास्तव भविष्यात अशा स्वरूपाच्या नियुक्त्या करताना शासन स्तरावर प्रशासकीयदृष्ट्या समन्वय राखण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत,-

१. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या विभागांतर्गतच्या ज्या आयोग / न्यायाधिकरण / प्राधिकरण / नियंत्रण मंडळ इ. वर सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त अखिल भारतीय सेवेतील / राज्य शासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची अध्यक्ष / आयुक्त / सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येते अशा पदांची माहिती सामान्य प्रशासन विभागांतर्गत भाप्रसे आस्थापनेला सदर परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसात उपलब्ध करून द्यावी.

२. भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांना सेवानिवृत्ती / स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर आयोग / न्यायाधिकरण / प्राधिकरण / नियंत्रण मंडळ इ. वरील पदावर नियुक्ती देण्यासंदर्भाने सर्व विहित कार्यपध्दती संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून अवलंबिण्यात आल्यानंतर, सदर नस्ती सामान्य प्रशासन विभागांतील भाप्रसे आस्थापनेअंतर्गत नियामक मंडळ कक्षाकडे आदेश निर्गमित करण्यापूर्वी अनौपचारिक संदर्भासाठी पाठविण्यात यावी आणि तद्नंतर आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात यावी.

३. एखाद्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून भाप्रसे अधिकाऱ्यास सेवानिवृत्ती / स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर नियुक्ती देण्यासंदर्भातील आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात आली असेल / अंतिम टप्प्यात असेल आणि दरम्यान अन्य प्रशासकीय विभागाकडून दुसऱ्या एखाद्या पदावर त्याच अधिकाऱ्यास नियुक्ती देण्यासंदर्भाने अनौपचारिक संदर्भाकरिता सामान्य प्रशासन विभागातील भाप्रसे आस्थापनेअंतर्गतच्या नियामक मंडळ कक्षाकडे नस्ती प्राप्त झाल्यास सदर बाब मा. मुख्य सचिव यांच्यामार्फत

संबंधित विभागाच्या निदर्शनास आणण्यात येईल आणि तद्नंतर संबंधित प्रशासकीय विभागाने शासन मान्यतेने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२०१२१८५६२९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2017.09.20 15:20:01 +05'30'

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. निवड नस्ती.